# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.10.2024** **वार – शनिवार**

---

**पिंपरी चिंचवड**

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी होणा-या जनसंवाद सभांचं आयोजन केलं जाणार नाही, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी  दिली आहे. 206, पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या वतीने स्वीप उपक्रमांतर्गत कार्यक्षेत्रात व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे.  अजंठानगर इथल्या “होम फॉर द ब्लाईंड”   या अपंग रोजगार उद्योग आणि तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात मतदार जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात अंध मतदारांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली. यावेळी बालाजी गिते यांनी अंध मतदारांसाठी मतदान केंद्रावर उपलब्ध असणा-या रॅम्प, व्हीलचेअर, मदतनीस, भिंग, ब्रेल मतपत्रिका याशिवाय सक्षम ऍ़पद्वारे नेण्या आणण्याची सोय इत्यादी सुविधांविषयी माहिती दिली. याच मतदारसंघ कार्यालयामार्फत गांधीनगर, पिंपरी येथील मदीना मशीद या प्रार्थना स्थळाजवळ मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी उपस्थित बांधवांनी “आम्ही धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."  अशी शपथ घेऊन 100 टक्के मतदानाचा निर्धार केला.

**निरगुडकर**

पक्ष हा नेत्यांमुळे नसतो तर कार्यकर्त्यांमुळे असतो. त्यामुळे कार्यकर्त्यांनी मतदारांमधील उदासीनता कमी करून पक्षाचे मतदान वाढविण्यासाठी थोडे अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असं मत ज्येष्ठ पत्रकार डॉक्टर उदय निरगुडकर यांनी व्यक्त केलं.  डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीनं आयोजित 'उत्सव लोकशाहीचा - प्रत्येक मत महत्त्वाचे ' या विषयावर ते आज बोलत होते.

**पुणे प्रादेशिक परिवहन**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकांकडून पुण्यात येणाऱ्या-जाणाऱ्या खासगी वाहतूक कंपन्यांच्या 82 बस गाड्यांची तपासणी केली. यात 36 कंपन्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे . यातून तीन लाख 47 हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दिवाळीत खासगी बस कंपन्या प्रवाशांना जादा दराने तिकिटे विकतात. हे प्रकार रोखण्यासाठी आरटीओ प्रशासनाने दोन वायुवेग पथकं स्थापन केली आहेत. या तपासणीत काही बस गाड्यांना परवाना नसल्याचं आढळलं तर प्रवासी वाहतुकीला परवानगी असताना काही गाड्यांमधून मालाची वाहतूक सुरु होती तसंच काही गाड्यांच्या योग्यता प्रमाणपत्राची वैधता संपली होती, त्यामुळे कारवाई केल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिली.

**नदीसुधार**

नदी सुधार योजनेच्या यशस्वीतेसाठी पुणे शहरातील नाल्यांच्या बाजूने टाकण्यात आलेल्या मैलापाणी वाहिन्यांचे पाणी, फुटलेल्या चेंबर्समधून नदीत जाउ नये तसंच मैलापाणी वाहिन्या कायम वाहत्या राहाव्यात यासाठी पुणे महापालिका प्रशासनाने विशेष कार्यपद्धती अवलंबिण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली आज शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाबाबत या विभागातील अधिकाऱ्यांची बैठक झाली. नाल्यातील मैलापाणी वाहिन्यांचा ड्रोन सर्व्हे करण्यात आला असून या वाहिन्यांच्या चेंबर्सच्या नियमित सफाईच्या नियोजनावर भर देण्यात आला आहे.

**लासलगाव-बंद-बाजारपेठ**

कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती दिवाळी निमित्त सोमवार दिनांक 28 ऑक्टोबर ते शनिवारी 2 नोव्हेंबर पर्यंत सलग सहा दिवस बंद राहणार आहे. या सहा दिवसात व्यापारी कांदा खरेदी करणार असल्याने बाजार समिती बंद राहणार असल्याचे बाजार समितीच्या प्रशासनानं कळवलं आहे.

**अर्धापूर**

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या अनाथ मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी भोई प्रतिष्ठानच्या पुण्यजागर प्रकल्पातर्फे दिवाळी स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पुणेकर उत्स्फूर्तपणे पुढे आलेत ही अत्यंत स्तुत्य बाब आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब फडणवीस यांनी यावेळी केले. या मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी पुण्यातील अनेक शैक्षणिक संस्थांनी मदतीचा हात पुढे केला आहे.

**राजेश पांडे नियुक्ती**

महाराष्ट्र भाजपचे उपाध्यक्ष राजेश पांडे यांची महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून पांडे यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची दखल घेत पक्षानं पांडे याना ही नवी जबाबदारी दिली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पुण्यात खेळल्या जाणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय फलंदाजांची कामगिरी निराशाजनक झाली. न्यूझीलंडनं दिलेल्या 359 धावांच्या आव्हानाला सामोरं जाताना, भारतीय संघ 245 धावाच करू शकला आणि हा कसोटी सामना 113 धावांनी जिंकत न्यूझीलंडनं या मालिकेत 2– 0 अशी आघाडी घेतली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहण्याची शक्यता असून कमाल तापमान 34 अंश सेल्सियसच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**